शनिवार, दिनांक १५ फेब्रुवारी २०२० रोजीच्या राज्यस्तरीय चर्चासत्राची कार्यक्रम पत्रिका

- नाव नोंदणी : सकाळी ९.३० ते १०.१५
- उद्‌घाटन समारंभ : सकाळी १०.१५ ते ११.१५

  **उद्‌घाटक : डॉ. धनराज माने**
  (संचालक, उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य)
  **अध्यक्ष : ॲड. वि. वि. आंबेकर**
  (कार्याध्यक्ष, स. म. संस्था)

- प्रथम सत्र : ११.१५ ते १२.३०

  **बीजभाषण : प्राचार्य अनिरुद्ध देशपांडे**
  (माजी प्राचार्य, बी. एम. सी. सी. पुणे)

- भोजन : १२.३० ते १.३०
- द्वितीय सत्र : खुली चर्चा दुपारी १.३० ते ३.००

  **डॉ. नलिनी गुजराथी** (माजी प्राचार्या, ज्ञानप्रबोधिनी, पुणे)
  **डॉ. संजीव सोनावणे** (अधिष्ठाता, आंतरविद्याशाखा)
  **डॉ. मनोहर चासकर** (अधिष्ठाता, विज्ञान व अभियांत्रिकी विद्याशाखा)

- समारोप समारंभ : ३ ते ४

  **प्रमुख अतिथी : डॉ. नितीन करमळकर**
  (कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ)
  **अध्यक्ष : मा. श्री. विकास काकतकर**
  ( कौन्सिल सदस्य, स. म. संस्था )

## चर्चासत्र संयोजन समिती

१. ॲड. वि. वि. आंबेकर, अध्यक्ष
२. डॉ. ए. पी. कुलकर्णी, उपाध्यक्ष
३. प्राचार्य डॉ. पी. एन. शेंडे, निमंत्रक
४. प्राचार्य अविनाश ताकवले, सदस्य
५. प्राचार्या श्रीमती धनश्री कुवळेकर, सदस्य
६. प्राचार्य सतीश वाघमारे, सदस्य
७. प्रा. विनय बोडस, समन्वयक

सरस्वती मंदिर संस्थेचे
**सरस्वती मंदिर नाईट कॉलेज ऑफ कॉमर्स ॲण्ड आर्टस्**
१३५९, शुक्रवार पेठ, बाजीराव रोड, पुणे - २
(नॅक पुनर्मूल्यांकन - 'ब' दर्जा)

सरस्वती मंदिर संस्थेच्या शतकमहोत्सवानिमित्त
सरस्वती मंदिर नाईट कॉलेज ऑफ कॉमर्स ॲण्ड आर्टस्,
आणि
आजीवन अध्ययन व विकास विभाग
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

# नवीन शैक्षणिक धोरण (अंतिम मसुदा)
# अंमलबजावणी व आव्हाने

या विषयावरील एक दिवसीय
राज्यस्तरीय चर्चासत्र
शनिवार, दिनांक १५ फेब्रुवारी २०२०
वेळ - सकाळी ९.३० ते ४
: निमंत्रक :
प्राचार्य, डॉ. पी. एन शेंडे

**स्थळ**
सरस्वती मंदिर संस्थेचे झांजले सभागृह
१३५९, शुक्रवार पेठ, बाजीराव मार्ग पुणे ४११००२
दूरध्वनी : ०२० - २४४३३०१८
Email : smncca@rediffmail.com
saraswatimandir1@gmail.com
Web: www.smnightcollege.org
प्रा. विनय बोडस : ८८८८८५८९४०

## संस्थेविषयी

शिक्षणापासून वंचित, कष्टकरी समाज घटकाला शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी १९२० साली सरस्वती मंदिर संस्थेची स्थापना झाली. दिवसभर कष्ट केल्यानंतर, कौटुंबिक जबाबदारी पूर्ण केल्यानंतर सुद्धा शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी रात्रशाळा सुरु केल्यामुळे जे विद्यार्थी शिक्षणापासून वंचित रहात होते त्यांना शिक्षणाची दारे खुली झाली. या मुख्य उद्देशापासून अजिबात न ढळता गेली शंभर वर्षे संस्थेने अनेक शैक्षणिक व समाजोपयोगी उपक्रम कार्यान्वित केले की ज्यामुळे अनेक गरजू लोकांचे जीवनमान उंचावले. संस्थेचे हे शतक महोत्सवी वर्ष असून संस्थापकांनी गरीब, कष्टकरी व वंचित विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याच्या उद्देशाने सुरु केलेली संस्था आजसुद्धा त्याच उद्दिष्टपूर्तीसाठी कार्यरत आहे.

## महाविद्यालयाविषयी

पुण्यातील सरस्वती मंदिर संस्थेने २१ व्या शतकातील काळाजी गरज ओळखून शिक्षणापासून वंचित राहिलेल्या पण शिक्षणाचा ध्यास असणाऱ्या, मात्र कौटुंबिक जबाबदारी व नोकरीमुळे शिक्षणापासून दूर राहिलेल्या समाजाला उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी १५ सप्टेंबर १९९२ साली रात्र महाविद्यालयाची स्थापना केली. आज महाविद्यालय हे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी कायमस्वरूपी संलग्न असून यु.जी.सी. कडून १२ (बी) व २ (एफ) दर्जाप्राप्त केलेले मराठी माध्यमाचे एकमेव रात्र महाविद्यालय आहे. महाविद्यालयात बीए., बीकॉम, एम.ए. (मराठी व इकॉनॉमिक्स), एम.कॉम. तसेच जॅपनीज, फ्रेंच, जर्मन या परकीय भाषांचे प्रमाणपत्र व पदविका इ. अभ्यासक्रम आहेत. शिक्षणाबरोबरच संस्कार, स्व-ध्येयाची जाण व राष्ट्रभान यांची जाणीव विद्यार्थ्यांना करुन देऊन त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी व उत्कर्षासाठी महाविद्यालयात विविध उपक्रम सातत्याने राबवले जातात.

## चर्चासत्राविषयी

शतकपूर्तीचे औचित्य साधून विविध उपक्रमांमार्फत संस्थेशी संबंधित सर्व घटकांशी संवाद साधत असताना शिक्षणक्षेत्रात होवू पाहणाऱ्या बदलांबाबत सजगता राखत "नवीन शैक्षणिक धोरण अंतिम मसुदा" या बाबत व्यापक चर्चा घडवून आणणे हे उद्दिष्ट ठेवून "सरस्वती मंदिर संस्था" आणि आमचे नाईट कॉलेज, महाराष्ट्रातील सर्व कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयांचे संस्थाचालक, शिक्षक आणि प्रशासकीय कर्मचारी यांच्यासाठी 'नवीन शैक्षणिक धोरण अंतिम मसुदा - अमंलबजावणी आणि आव्हाने' या विषयावर एकदिवसीय राज्यस्तरिय चर्चासत्र आयोजित करीत आहे.

येवू घातलेल्या नव्या शैक्षणिक धोरणाच्या संदर्भात विविध तज्ज्ञांच्या मार्गदर्शनासह गटचर्चेच्या माध्यमातून साधकबाधक चर्चा व्हावी हा या चर्चासत्राचा मुख्य उद्देश आहे.

या चर्चासत्रामध्ये आपण आपल्या संस्थेतील शिक्षक आणि प्रशासकीय कर्मचारी या सर्वांनी सहभागी व्हावे असे स्नेहपूर्ण निमंत्रण आम्ही देत आहोत.

## चर्चासत्र शुल्क

या एकदिवसीय राज्यस्तरीय चर्चासत्राचे शुल्क प्रति व्यक्ती रु. २००/- इतके आहे. सदर शुल्क नाव नोंदणीचे वेळी रोख स्वरूपात स्वीकारले जाईल.

## शोधनिबंध

प्रस्तुत चर्चासत्राच्या निमित्ताने 'नवीन शैक्षणिक धोरण अंतिम मसुदा' या संकल्पनेवर आधारित शोधनिबंध सादर करावे असे आवाहन आम्ही करतो. सदर शोधनिबंधासाठी शब्द मर्यादा १२०० इतकी असून इंग्रजीमध्ये टाईम्स न्यू रोमन १२ फॉण्ट किंवा मराठी मध्ये कृती देव १० फॉण्ट मध्ये सादर करावेत.

सदर शोधनिबंध तज्ज्ञ समितीमार्फत पडताळणी झाल्यानंतर चर्चासत्राच्या स्मरणिकेमध्ये छापण्यात येतील. दिनांक ८ फेब्रुवारी २०२० पर्यंत हे शोध निबंध महाविद्यालयाच्या या smncca@rediffmail.com ईमेल आयडीवर पाठवावेत, ही विनंती.